# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २१–०९/ दिनांक :

१) कार्यवाह/ ग्रंथपाल,
महात्मा फुले मोफत वाचनालय,बोरगांव, अर्जदार
मु.पो. बोरगांव, ता. वाळवा, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय इस्लामपूर, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय इस्लामपूर १, जि. सांगली

**कोरम :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

# न्याय निर्णय

श्री. एस.आर.बांबळे, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ११.०५.२००९

तक्रारदार कार्यवाही / ग्रंथपाल, महात्मा फुले मोफत वाचनालय (तक्रार प्रकरण २१/०९) बोरगांव, ता. वाळवा, जि. सांगली येथील घरगुती प्रकारचे वाचनालयाचे वीज जोडणीचे अवास्तव रकेचे वीज बील आले. वीज मिटरचे नियमित रिडींग घेतले जात नाही, चुकीची वीज बिले दिली जातात. यास्तव वि.प.चे अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी, बील दुरुस्ती करुन रकमेचे हप्ते करुन मिळावे अशी ग्राहकाची तक्रार आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली यांजकडे क्ष नमुन्यात दि. १५.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केली आहे. परंतु दोन महिने उलटूनही अद्यापपावेतो त्यावर निकाल मिळालेला नाही. दरम्यान तक्रारदार यांनी मंचाकडे दि. ३.३.२००९ रोजी अ नमुन्यात अपील दाखल केले आहे. त्यानुसार वि.प.चे संबंधित अधिकाऱ्याकडून मुद्देनिहाय म्हणणेची मागणी करण्यात आली व सुनावणीची तारीख दि.२१.४.२००९ सांगली येथे ठेवण्यात आली होती. ती पुढे ढकलण्यात येऊन दि. ५.५.२००९ रोजी सांगली येथे पार पडली.

सुनावणीवेळी स्वत: तक्रारदार श्री. आनंदराव दत्तात्रय शिंदे, ग्रंथपाल तर वि.प.तर्फे कार्यकारी अभियंता, इस्लामपूर विभाग, सहाय्यक अभियंता,इस्लामपूर उप विभाग १ इ. हजर होते.

तक्रारदार यांचे म्हणणे

तक्रारदार कार्यवाह / ग्रंथपाल, महात्मा फुले मोफत वाचनालय, ग्रा. क्र. २८४१४००२३३३५ बोरगांव, ता. वाळवा, जि. सांगली यांनी त्यांचे वीज जोडणीची बिले जून २००६ पर्यंत नियमित व योग्य येत होती, परंतु त्यानंतरचे कालावधीत रिडींग न घेता व प्रत्यक्ष रिडींगपेक्षा पुढील आठवड्याचे अंदाजे रिडींग नमूद करुन अवास्तव रकमेची बिले आली. प्रत्यक्षात रिडींग व फोटो रिडींग घेतले जात असूनही त्याचा परिणाम बिलात मिळत नव्हता. यामुळे तक्रारदार यांना वाचनालय जमाखर्चात वीज आकार देयकांचा खर्च दाखविता आला नाही. म्हणून यास कारणीभूत असलेल्या वितरण कंपनीचे संबंधित अधिकाऱ्यावर वीज नियामक आयोगाचे नियमाप्रमाणे दंडात्मक कारवाई करावी व सदर नुकसान भरपाईची रक्कम तक्रारदार यांना मिळावी. तसेच त्या सोबत अर्जदाराचा प्रवास व इतर खर्च, वकील सल्ला फी आदी खर्च भरपाई म्हणून मिळावी. तसेच वीज बील योग्य रकमेचे व दुरुस्त करुन मिळावे व रक्कम भरणा करणे करीता समान ५ हप्ते मिळावेत. वि.प.चे अधिकाऱ्यांचे या चुकीस्तव निलंबन करावे. आदी मागण्या करण्यात आल्या.

वितरण कंपनीचे म्हणणे

तक्रारदाराचे तक्रारीवर वितरण कंपनीकडून बिलात चुकीचे रिडींग दाखविलेचे व बील रक्कम जादा नमूद केलेचे मान्य करण्यात आले. या कारणास्तव तक्रारदार यांनी २ वर्षात वीज बील भरले नाही असे सांगितले. डिसेंबर २००६ पर्यंतची बिले योग्य आहेत. पुढील २४ महिन्याचे बील जानेवारी २००७ ते डिसेंबर २००८ ची दुरुस्ती करुन बील देण्यात येईल असे आश्वासन दिले.

सदस्य सचिव यांचा निष्कर्ष

तक्रारदार यांचे वि.प.ने प्रत्यक्ष रिडींग नोंद करुन घेतले / फोटो रिडींग घेतले असतानांही बिलात चुकीचे रिडींग नमूद करुन वीज बिले दिली असलेचे दिसते. तक्रारदार यांनी पुरावा म्हणून वि.प.चे तंत्रज्ञ यांनी लिहून दिलेले दि .९.१०.२००७ चे ४२९३, दि. ७.१.२००८ चे ४३१६ , दि. २६.१०.२००८ चे ४३७९ व दि. २७.१२.२००८ चे ४३९५ या दिनांकाची रिडींग सादर केली आहेत. तरीही वि.प.ने त्याची दखल न घेता जानेवारी २००९ चे बिलात मीटर रिडींग ५०९० नमूद केले आहे. एकंदरीत दि. ७.४.२००७ पासून पुढे ५०२० हेच रिडींग बिलात सलगपणे नमूद आहे. अशा स्थितीत वितरण कंपनीने तक्रादाराची वीज जोडणी कायमस्वरुपी बंद करणेची नोटीस दिलेली दिसते. दि. ७.१.२००७ ते ७.४.२००८ काळाचे बिलात ९८० युनिटचा तर ८.१.२००८ ते ७.४.२००८ काळाचे बिलात ९७८ युनिटचा वापर दाखविला आहे. त्यामुळे वितरण कंपनीचा निष्काळजीपणा व दुर्लक्ष स्पष्ट होत आहे.

अर्जदाराचे निवेदनाप्रमाणे डिसेंबर २००६ पर्यंतचा वापर दि. ७.१.२००७ रोजी मीटर रिडींग ४०४० नोंदले आहे व त्या तिमाहीचे बिलात ५० युनिटचा वापर दाखविला आहे. त्या बिलाबाबत तक्रारदाराची तक्रार नाही असे दिसते. सबब ४०४० या मीटर रिडींग नंतरचे मीटर रिडरने अंदाजे प्रत्यक्ष पाहणी न करता मीटर रिडींग दाखविले आहे. परिणामी, पुढे चुकीची बिले देणेत आली. सबब ७ जानेवारी २००७ रोजी चालू रिडींग ४०४० पासून पुढे डिसेंबर २००८ चे चालू रिडींग ४३९६ या दोहोमधील फरक २५८ युनिटचे एकूण २४ महिन्यांचे बील ग्राहकास देणे आवश्यक आहे व ते योग्यच होईल.

तक्रारदारने सुचविलेले संबंधित कर्मचाऱ्याचे निलंबन करा, त्याचे वेतनातून बील रक्कम वसूल करा वगैरे मागण्या मा. आयोगाचे कक्षात येत नाहीत.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, उपलब्ध कागदपत्रे, युक्तीवाद, पुरावे इ. विचारात घेऊन सदस्य सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच यांचेतर्फे खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

## आदेश

१) ग्राहकाचे मिटरचे नोंदी न घेतले कारणास्तव विद्युत नियामक आयोगाचे विनियम २००५ कृती मानके परिशिष्ट अ नुसार रु. १५००/- ( प्रथम तिमाही मार्च २००७ रु. १००/- व पुढील ७ तिमाही रु.२००/- प्रमाणे ) देय भरपाई वि.प.ने ग्राहकास द्यावी.

२) जानेवारी २००७ ते डिसेंबर २००८ कालावधीतील २५८ युनिटचे वीज बील प्रत्यक्ष मीटर रिडींग प्रमाणे दुरुस्त करुन द्यावे व ग्राहकास हिशोब समजावून सांगणेत यावा. ३ समान हप्त्यात ३ महिन्यात भरावी, सोबत चालू भरावे.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ११.०५.२००९

( एस. आर. बांबळे )
सदस्य सचिव

श्री. काकासाहेब य. जगताप, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :